
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १३५२



# मेघा

REFBK-0009412
REFBK-0009412

— पुरुषोत्तम कुलकर्णी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत.
अनुक्र ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........
REFBK-0009412
REFBK-0009412

# मेघा

• निवडक कविता •

पुरुषोत्तम कुलकर्णी

सर्व हक्क प्रकाशकाधीन

: प्रकाशक :

**मधुकर राजाभाऊ डांगरे**

कांग्रेस नगर, नागपूर.

: मुद्रक :

**बा. गो. ओगले**, बी. ए.,

नक्षत्र प्रेस, महाल, नागपूर.

: मुखपृष्ठ :

**नागेश आर्डे**, जी. डी. आर्टस्.

*किंमत सव्वा रुपया*

प्रथमावृत्ती, जानेवारी १९५७

# प्रस्तावना

श्री. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनीं आपल्या या पहिल्याच काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्यासाठीं माझी कां निवड केली हें मला सांगता येणार नाहीं. पण स्नेहभावानें त्यांनीं मजवर सोंपविलेली ही कामगिरी मी पत्करण्याचें धाडस केलें आहे, एवढें मात्र खरें. प्रत्येक मनुष्य हा आयुष्यांत कधीं तरी 'कवी' असतो असें म्हणतात. लेखन-वाचनाचा छंद असणाऱ्याच्या बाबतींत हें म्हणणें खरें असावें. कारण लहानपणी मीहि एक आर्या करून 'आनंदा' कडे पाठविली होती. पण त्या कवितेवर आपलें नांव देण्याचें मला धैर्य झालें नव्हतें. तरीहि ती 'चांगली' म्हणून कै. वासुदेवराव आपटयांनीं निनांवीच प्रसिद्ध केली होती. काव्यकर्तृत्वाशीं माझा यापेक्षां अधिक संबंध नाहीं. पण प्रकाशनाशीं मात्र माझा सध्यां घनिष्ट संबंध आला आहे.

श्री. कुलकर्णी यांच्या काव्य-गुणाशीं माझा प्रथम परिचय प्रस्तुत पुस्तकाचीं मुद्रितें हातीं आल्यावरच झाला. त्यांच्या या काव्य-संग्रहांत एकूण एकोणपन्नास कविता आहेत. आणि त्यांत निरनिराळे भाव प्रगट झालेले असून ते त्यांनी फार चांगल्या रीतीनें व्यक्त केले आहेत. काव्याची व्याख्या जगन्नाथ पंडितांनीं

'रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम्' अशी केलेली आहे. साहित्यशास्त्रांत निर्दिष्ट केलेल्या नऊ रसापैकीं कोणत्या तरी रसाचा अनुभव काव्य वाचतांना आला पाहिजे अशीहि 'काव्य' या गुणास पात्र असलेल्या कवितेपासून अपेक्षा असते. या दोनीहि कसोटयास श्री. कुलकर्णी यांच्या कविता उतरतात, असें मला वाटतें. रम्य आणि उदात्त कल्पनांचा विलास त्यांच्या कवितांतून आढळतो व कविता वाचून एक प्रकारचा आल्हादहि मनाला होतो.

प्रस्तुत 'मेघा' हा कुलकर्णी यांच्या स्फुट काव्यांचा संग्रह आहे. त्यांत त्यांनीं नाना भाव-भावना व्यक्त केल्या आहेत. कविता लिहिण्याच्या आपल्या छंदाबद्दल टीकाकारांना ते सांगतात (पृष्ठ १४)--

धरा आमुच्या कविता आपण
टीका खड्गावरी
तयांतुनीं जी उरली सुरली
राहिल कविता खरी
बोथट होतिल शर टीकेचे
जेथें कवितेपुढें
तिथें तियेचें स्वागत होइल
जिव्हेनें चहुंकडे

* * *

अक्षय भाळीं तिच्याच लिहिला
अमरपणा काळानें
अशीच कविता लिहिणें जगणें
हें आमुचें ब्रीद. . . .
हा आमुचा छंद

हें ब्रीद बाळगून कवीनें आपला छंद चालू ठेवून या कविता लिहिल्या आहेत.

गाणीं घ्या हो गाणीं (पृ. ५५) या कवितेंत कवि म्हणतो–

गाणीं घ्या हो गाणीं
विरह मंजिऱ्या प्रीत फुलोरा, एका मोलें दोन्हीं

असें सांगून पुढें वाचकांना तो बजावतो कीं,

या न तारका, ही न चंद्रिका
ही न रवीची तेज शलाका
सुभगा या परि करितिल सेवा, रसिका मानुन धनी,
गाणीं घ्या हो गाणीं––

या काव्य संग्रहांत विरहमंजिऱ्या आहेत, प्रीतफुलोरा आहे व कविकल्पनेंतील सुगंधी सदाफुलीहि आहे ! परंतु त्याचबरोबर सद्य:स्थितीची वास्तवताहि आहे. उदाहरणार्थ प्रवास (पृ. २२) ही कविता पहा. ते लिहितात––

परिस्थितीच्या तिरडीवरती
मढें मनाचें माझ्या बांधुनी
चौघे केव्हां चालु लागती
व्यवहाराच्या रस्त्यावरुनी
आशा आकांक्षांचें माझ्या
सरपण गेलें आहे पुढती
ध्येयपूर्तिचें धरुन गाडगें
अनुभव चाले चौघांपुढती

श्री. कुलकर्णी यांच्या या संग्रहांतील कविता निरनिराळे भाव उत्कटतेनें व्यक्त करतात व जीवनांतील निरनिराळ्या प्रसंगांचें दर्शन घडवितात. कटिं लाविला पदर (पृ. ३०), यौवनगंधा (पृ. ३७), कामदेव उत्सव (पृ. ६१) या कवितांतील रसपरिपोष व लालित्य आल्हादकारक आहे. प्रसाद आणि कल्पनाशक्ति यांचें गोड मिश्रण श्री. कुलकर्णी यांच्या कवितांत वाचकांना आढळेल व तें आवडेलहि, असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र कार्यालय, नागपूर, दि. २२ जाने. १९५७ } पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

प्रिय वाचक—

गेल्या दहा-बारा वर्षांतील स्फुट कवितांचा हा संग्रह आपल्या हातीं देतांना माझें मन आनंदानें भरून येत आहे.

गेल्या दीड तपांत माझ्या जीवनांतल्या ज्या अनेक अवस्था मी अनुभवल्या त्यांचें स्मृतिकण ह्या कवितारूपानें मी आपणापुढें ठेवीत आहे. ती स्मृति ताजी राखण्याचें काम माझी कविता निष्ठेनें करीत आहे, याचा मला अभिमान वाटतो. कदाचित या कवितांच्या अभिव्यक्तींत व्यक्तिगत-पणाच अधिक वाटण्याचा संभव आहे याची मला जाणीव आहे. परंतु याहि व्यक्तिगत सुखदुःखमय काव्य पंक्तींतून वावरतांना आपल्याहि स्मृति क्षणभर हेलावल्या, सुखावल्या तरी या प्रपंचाचें सार्थक झाल्याची धन्यता मला लाभेल.

कवितांच्या प्रकाशनाचें अवघड काम माझे रसिक स्नेही श्री. मधुकरराव डांगरे यांनीं अत्यंत आपुलकीनें अंगिकारलें आणि नक्षत्र प्रेसचे मालक श्री. बा. गो. ओगले यांनी तितक्याच आपुल-कीनें आणि जिव्हाळ्यानें संग्रह छपाई केली. या दोघांचें ऋण मी कधींहि विसरणार नाही. केवळ शब्दांनीच त्यांचे याप्रसंगीं आभार मानून मी त्यांचे ऋणांतून अल्पशः मुक्त होत आहे.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व दै. महाराष्ट्राचे ख्यातनाम संपादक गुरुवर्य बाळासाहेब ढवळे यांनी मजला हातीं धरून मार्ग दाखविला. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळेंच मी वाचकांच्या भेटीस येऊं शकत आहे. त्यांचाहि मी अत्यंत ऋणी आहे. माझ्या अनेक सुहृदांनीं माझ्या कवितांबद्दल अनन्य आस्था दाखविली त्यांची यावेळीं मला आठवण होत आहे.

यासर्वांचा मजवरील लोभ असाच राहो व रसिक वाचकांची भेट वारंवार घडो, हीच इच्छा !

साठे बंगला, गिरीपेठ,
नागपूर.

पुरुषोत्तम कुलकर्णी

# —: अनुक्रम :—


| | कविता | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | मराठ-लक्ष्मी | ... | १३ |
| २ | टीकाकारास– | ... | १४ |
| ३ | आमुचें जीवन | ... | १५ |
| ४ | आत्मा | ... | १६ |
| ५ | आवर काळा आवर लौकर | ... | १७ |
| ६ | तूं बिजलीपरि गे | ... | १८ |
| ७ | क्षणभरच | ... | १९ |
| ८ | वाऱ्यापरि मन माझें | ... | २० |
| ९ | भावुक डोळे तुझे | ... | २१ |
| १० | प्रवास– | ... | २२ |
| ११ | भरदुपार माथ्यावरती | ... | २३ |
| १२ | शब्दराणी– | ... | २४ |
| १३ | सांजवल्या प्रकाशांत | ... | २५ |
| १४ | ताज | ... | २६ |
| १५ | मेघनेस | ... | २७ |
| १६ | पारवा | ... | २८ |
| १७ | कधीं मनांतली श्रद्धा | ... | २९ |
| १८ | कटि लाविला पदर | ... | ३० |
| १९ | पदस्वामिनी | ... | ३१ |
| २० | चंद्रलोक | ... | ३२ |
| २१ | ये संध्ये | ... | ३३ |
| २२ | ती अधिरी अभिसारिका | ... | ३४ |
| २३ | विरह | ... | ३५ |
| २४ | नर्तकी | ... | ३६ |

| | कविता | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २५ | यौवनगंधा | ... | ३७ |
| २६ | अशीच यावी समता भूवर | ... | ३८ |
| २७ | मंदिर | ... | ३९ |
| २८ | हा वामन आला | ... | ४० |
| २९ | रंगुनी माझ्यासवें तू | ... | ४१ |
| ३० | आळ | ... | ४२ |
| ३१ | प्रणयपुराणें | ... | ४३ |
| ३२ | अगा क्रूरा पारध्या | ... | ४४ |
| ३३ | रुबाया– | ... | ४५ |
| ३४ | गुन्हा ! | ... | ४६ |
| ३५ | तुज पाहुन पाउल अडलें | ... | ४७ |
| ३६ | कधीं सुखाचें हें दार | ... | ४८ |
| ३७ | फूल | ... | ४९ |
| ३८ | तुझ्या आठव गंधांत | ... | ५० |
| ३९ | सायतांनि घडतां– | ... | ५१ |
| ४० | काळाच्या भाळावर | ... | ५२ |
| ४१ | अनंतकाळचा दिगंत प्रवास | ... | ५३ |
| ४२ | आज-उद्यां– | ... | ५४ |
| ४३ | गाणीं घ्या हो गाणीं | ... | ५५ |
| ४४ | मन मदनाचें माझें | ... | ५६ |
| ४५ | सहीनिशाणी | ... | ५७ |
| ४६ | तें माझें घर | ... | ५८ |
| ४७ | दोन पाउलें | ... | ५९ |
| ४८ | कामदेव उत्सव | ... | ६१ |
| ४९ | महाराष्ट्र गीत | ... | ६३ |

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२१५९५ वि: ९१०५
९३५८ नों: दि: १२/३/५०

कै. आईच्या स्मृतीस—

माझ्या मराठीचा बोल
ज्ञानेशाचा—अमृताचा
सुखेनैव होवो सदा
रस माझ्या रसनेचा—

ग्रा. क्र. ९४९२

## १ मराठ-लक्ष्मी

खेळतो निसर्गहि जिथें विविध रूपांत
भासतें सृष्टिहि जिथें आगळी नित्य
त्या सह्यभूमिवर मंदिर हें उभवियलें--
पदकमलें ज्याची राही सागर धूत
हें मंदिर आम्ही उभवियलें पाषाणीं
वेंचून आयु हो, आमुच्या कैक पिढ्यांनी
अजुनीहि स्मरती टाकीचे ते घाव--
आणिती देवपण घडवियल्या पाषाणीं
मातींत कालवुन भाळावरले मोतीं
आमुच्या पित्यांनी चढवियल्या या भिंती
हीं दारें, शिखरें, उभे मनोरे, सारे--
आमुच्या श्रमाची गाथा सारे गाती
झांकून मूर्ति का देवपणा हो झांके ?
दो हातांनीं का तेज रवीचें झांके ?
मंदिरीं तेवतो नंदादीप प्रशांत--
दीपांत तेज हो नव्या युगाचें झळके
ह्या चिऱ्याचिऱ्यांतुन निघेल एकच साद
ह्या गाभाऱ्यांतुन घुमतो नित पडसाद
ही मराठ-लक्ष्मी कोटि-भुजा जनदेवी--
राहते जागते दैवत हें दिन रात
ज्ञानेश, तुका अन् रामदास, नाथांनीं
गाइला जिचा नित जयजयकार कवींनीं
स्वातंत्र्य घोषिता, मराठ कोटि भुजाही
हिज वंद्य ब्रीद हो, पंच प्राणाहुनी--

✲

# २ टीकाकारास

धरा आमुच्या कविता आपण
टीका खड्गावरी
तयांतुनी जी उरली सुरली
राहिल कविता खरी
बोथट होतिल शर टीकेचे
जेथें कवितेपुढें
तिथें तियेचें स्वागत होइल
जिव्हेनें चहुंकडे
अशीच कविता जयें जगविली,
जिंकियली टीकेनें
अक्षय भाळीं तिच्याच लिहिला
अमरपणा काळानें
अशीच कविता लिहिणें जगणें
हें आमुचें ब्रीद
टीकेची ना खंत अम्हांला,
ना कसले वेध--
खुशाल टीकाघातें आम्हां
करा जायबंद--
अशीच कविता लिहिणें, जगणें--
हा आमुचा छंद--

# ३ आमुचें जीवन

मलीन नीरस जीवन सगळें, निर्मलता गेली
बावरलें जग सौख्य मृगजलीं, आशाही सरली
टाहो काहो असा फोडता, निराश ऐसे होता
संसारांतिल सार त्यजुनिया, हाय विरागी होता
नर जन्मार्मधि नरा करुनि घे नर नारायण कुडी
सांगुन गेला कवी कुणीसा जपा मंत्र हरघडीं
कालहि नव्हतों येथें आपण नसूं उद्यांही येथें
सुखदुःखाचे पेले म्हणुनी करायचे ना रिते
सदाफुली बागेंत बहरली, निर्माल्याची धन
त्या पुष्पांच्या सुगंधांत परि, मोहुन गेलें मन
फुलली, मेली, सदाफुली परि सुगंध दरवळलेला
पुन्हां पुन्हां तो स्मरेल मजला मोहवील चित्ताला
पुरे जाहली म्हणता कविता कैशी होइल पुरे
काळाच्या ओघांत वाहुनी, गाथा वरती उरे
जाइल कविही, काया जाइल, राहिल मागें कविता
आणिक तिजला रसिक आळविल,उदेल जोंवरि सविता
असें असावे, असेंच आहे–जीवन कविचें, आपुलें––
जोंवरि कविता फिदा मजवरी–तोंवरी जीवन फुललें–

## ४ आत्मा—

पुन्हा पुन्हा पाहतो मी—तोच भाव दृश्यांतला
क्रूस शरीराचा उभा—आत्मा लटकला त्याला
फुलांतील गंधापरि—होता वसला शरीरीं
निळ्ठेंतून जन्मा आली—भाळीं निर्माल्याची थोरी
तिळमात्र सुखासाठीं—झिजे दिनरात्र आत्मा
सारे पर्वत दुःखाचे जिथें तिथें संशयात्मा
भिजे, वाळे, जळे नच, नच तुटे आघातांनी
आत्मा अमर हो नित्य, बोलतात तत्त्वज्ञानी
इथें परि त्याच्याभोतीं—सदा निखारे फुलले
दुःखाश्रूंत इथें आत्मा—रोज भिजे रोज वाळे,
आघातांनी झाली त्याची—अहो कितीदां शकलें
दुःख रतिभर कुणी नाहीं निवारूं शकलें
थकलेल्या थिजलेल्या, दुबळ्या या शरीरांत
आत्मा अगतिक मृत, होता तसाच राहत
पुन्हा पुन्हा पाहतो मी तोच भाव दृश्यांतला
क्रूस शरिराचा उभा—आत्मा लटकला त्याला——

# ५ आवर काळा, आवर लौकर!

असेंच आहे इथून पुढती जगावयाचें जिणें मला जर
शर्थ कशाला मग जगण्याची, आवर काळा, आवर लोकर
एकच होती मनांत आशा, श्रमणाऱ्यांचें आहे जीवन
आगळीच पण इथली भाषा, रमणाऱ्यांचें आहे जीवन
मोलच नाही इथें श्रमाला, श्रमणाऱ्याला मिळे न भाकर
ढोंगाचा बंगला जयाचा–दारीं त्याच्या झुलती चाकर
ही गरिबांची नाही दुनिया, न्यारी माणसें या दुनियेंतिल
नसेल किमया तुम्हांपाशीं, श्वास घ्यावया अवघड जाइल
इथें हवेला लागे पैसा, पाणी विकतें पैशावारी
पैशाची हो दुनिया ही पण–मृत्यू मिळतो फुकटावारी
मनांत तुमच्या असो कांहिही–जनांत तुम्ही हंसून दावा–
असाल तुम्ही खरे परंतु–खोटयाचाहि मांडा दावा––
ह्याच जिण्याचे राजे आम्हो–'दास' मिरवितो राजेशाही
क्षणिक सुखाच्या आभासास्तव–ढोल बडवितो ढोंगाचेही
–असेंच आहे इथून पुढती–जगावयाचें जिणें मला जर
खैर कशाला मग जगण्याची–आवर काळा, आवर लौकर

*

# ६ तूं बिजलीपरि गे

तूं बिजलीपरि गे आलिस माझ्या दारीं
पळभरच उजळुनी केलिस दुनिया न्यारी
ही दीप्ती चंचल धरली कवटाळुन मी
अन् गेलिस निघुनी ओढ लावुनी उरीं--
स्वच्छंदपरी तूं नकोस येऊं पुन्हां
तूं नकोस दावूं पुन्हां गोड त्या खुणा--
कीं अंतर ज्यातें वेडावे अजुनीही
तूं नकोस खिळवूं माझ्यावर लोचनां--
पांथस्थ एक मी मुशाफीर दुनियेचा
तूं काव्यप्रतिभा रसिकच मी काव्याचा
तव हास्य सुधेसम प्रणयीं मनांत माझ्या
झंकारित जाई सहज विषय काव्याचा
वाटतें तुझ्यासह वर्षाअमृत न्हावें
वाटतें तुझ्यासह शरदसुधा मी प्यावें
परि वसंतवैभव राहो तुझियासाठीं
अन् दुःख तुझ्यांतिल माझ्या ओठीं यावें
गतस्मृतींत कधिं तूं होशिल उदासवाणी
वाटेल स्थिरावें वक्षावर टेकोनी
बाहूंत तेधवां घ्याया तुज येईन
येईन, टिपाया तव नयनीचें पाणी--

*

## ७ क्षणभरच !

आधार तियेला प्रभुवांचून ना कोणी
जगवीत देह ती कष्ट सदा उपसोनी
निरुपायें दूरच तिची बालकें सान
मायेचे स्मृतिकण पुलकित करिती मन
तोडुनिया अंतर चार शतक मैलांचें
ती सान बालकें तिज भेटाया आलीं
बिलगली तियेला लपली पदराखालीं
गहिंवरुन माउली घेई त्यांना जवळीं
—अन् वसंतवैभव जणुं ते चार दिसांचें
येवुनिया गेले क्षण मन फुलवायाचें
उडुनिया जायचीं पुन्हां पांखरें दूर
सोडून देवकी दूरच नंदकुमार--
क्षणभरच घेतले साखरपापे गोड
म्हणतांच पिलांनी आई जातो सोड--
क्षणभरच घेतलें टिपून त्यांना नयनीं
क्षणभरच दाटले तिचिया नयनीं पाणी--

# ६ तूं बिजलीपरि गे

तूं बिजलीपरि गे आलिस माझ्या दारीं
पळभरच उजळुनी केलिस दुनिया न्यारी
ही दीप्ती चंचल धरली कवटाळुन मी
अन् गेलिस निघुनी ओढ लावुनी उरीं--
स्वच्छंदपरी तूं नकोस येऊं पुन्हां
तूं नकोस दावूं पुन्हां गोड त्या खुणा--
कीं अंतर ज्यासें वेडावे अजुनीही
तूं नकोस खिळवूं माझ्यावर लोचनां--
पांथस्थ एक मी मुशाफीर दुनियेचा
तूं काव्यप्रतिभा रसिकच मी काव्याचा
तव हास्य सुधेसम प्रणयीं मनांत माझ्या
झंकारित जाई सहज विषय काव्याचा
वाटतें तुझ्यासह वर्षाअमृत न्हावें
वाटतें तुझ्यासह शरदसुधा मी प्यावें
परि वसंतवैभव राहो तुझियासाठीं
अन् दुःख तुझ्यांतिल माझ्या ओठीं यावें
गतस्मृतींत कधिं तूं होशिल उदासवाणी
वाटेल स्थिरावें वक्षावर टेकोनी
बाहूंत तेधवां घ्याया तुज येईन
येईन, टिपाया तव नयनीचें पाणी--

## ७ क्षणभरच!

आधार तियेला प्रभुवांचून ना कोणी
जगवीत देह ती कष्ट सदा उपसोनी
निरुपायें दूरच तिची बालकें सान
मायेचे स्मृतिकण पुलकित करिती मन
तोडुनिया अंतर चार शतक मैलांचें
ती सान बालकें तिज भेटाया आलीं
बिलगली तियेला लपली पदराखालीं
गहिंवरुन माउली घेई त्यांना जवळीं
–अन् वसंतवैभव जणुं ते चार दिसांचें
येवुनिया गेले क्षण मन फुलवायाचें
उडुनिया जायचीं पुन्हां पांखरें दूर
सोडून देवकी दूरच नंदकुमार––
क्षणभरच घेतले साखरपापे गोड
म्हणतांच पिलांनी आई जातो सोड––
क्षणभरच घेतलें टिपून त्यांना नयनीं
क्षणभरच दाटले तिचिया नयनीं पाणी––

✲

# ८ वाऱ्यापरि मन माझें

आठविती कधीं तरी–तुझ्या संगतीचे क्षण
माझ्या मानस मेघाची–कडा जाई उजळून
बोली अबोलीची तुझी–उत्सुकता सरितेची
प्रीतगंध प्राजक्तीचा–करी काहिली मनाची
तुझ्या ओठांची जाणीव-येइ मनींच्या ओठांना
उष्ण रुधिराची जिथें–घडे गोडशी घटना
आठविती अजुनीहि–करपाश रेशमाचे
भृंग कमलिनी संग–माझ्या रोमरोमीं नाचे
भाव लोचनीचे भोळे–घेतो नयनीं टिपून
भाव वैभव तयांचे–मना आठवे अजून
तुझ्या दूरतेचा परि–कधिं झोंबे अंगा वारा
वाऱ्यापरि मन माझें–धावें मग सैरावैरा–

# ९ भावुक डोळे तुझे

भावुक डोळे तुझें कधितरीं खिळती माझ्यावरती
कुसुमासम तव भाव कोवळे मोहुनिया टाकती
तव भावांची मूक अबोली ओती नित स्निग्धता
हृदयीं माझ्या परी वसतसें मधु गंधाची व्यथा--
विद्ध करुनिया क्षणांत जाती तुझे काजळी डोळे
तव नयनांतिल शीतलताही मानस माझें पोळे
हळुंच घातल्या डोळ्यांमधले कुटील अल्लड भाव
मदन बाण रे रुतला कोठे, जणुं म्हणती मज दाव
तव नयनांचा भाव आगळा अजुनि न कळला मला
घन तिमिरांतुन प्रभात तारा अजुनी ना हांसला
खिळवुन डोळे अचपळ भोळे, नयनीं माझ्या सदा
काय पाहशीं वेड्यापरि तूं मला न कळलें कदा
अजून नाही तुझ्या उकललें दृष्टीभेटींतिल गूज
बावरली ना अजून राधा ऐकुनीहि अलगूज--

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८३१२

# १० प्रवास

परिस्थितीच्या तिरडीवरती
मढें मनाचें माझ्या बांधुनी
चौघे केव्हां चालूं लागती
व्यवहाराच्या रस्त्यावरुनी
आशा आकांक्षांचें माझ्या
सरपण गेलें आहे पुढती
ध्येय पूर्तिचें धरुन गाडगें
अनुभव चाले चौघांपुढती
'मी' 'तूं' असलें नातें पोकळ
संसाराचा प्रचंड इमला
इथली तिथली चार माणसें
भासति केवळ क्षणैक मजला
जीवनांतल्या प्रवासामधें
दिवस असा क्रीं एक उगवतो
परिस्थितीच्या तिरडीवरुनी
व्यवहाराचा मार्ग चालतो

*

# ११ भर दुपार माथ्यावरती

भर दुपार माथ्यावरती
ठरेना, पाय वाळवंटीं—
अनाथ बालक कुणी एकटें
सरितेकांठीं वणवण फिरतें
रडत, ओरडत कुणा शोधतें—पायींची आग ती—
ठरेना, पाय वाळवंटीं

आई आई टाहो फोडित
अंत्यज बालक फिरे ओरडत
येता जवळीं जन हेटाळित —जाती अव्हेरिती
ठरेना, पाय वाळवंटीं

पडलें मूर्च्छित पोर बिचारें
पाहतात त्या दुरुनी सारे
उचली येऊनी कोण त्या त्वरें—दया प्रभूचित्तीं
ठरेना, पाय वाळवंटीं

केलें सावध बालक त्यांनी
कमंडलूंतिल पाजुन पाणी
लेंकरास कवटाळित जननी—घेऊनिया पोटीं—
ठरेना, पाय वाळवंटीं

## १२ शब्दराणी

केशभार सैल तुझा
रेशमाच्या बांधणींत
मोतियाचा सर तुझ्या
गोऱ्या भांग-रेखणींत
गालीं लाली गुलाबाची
ओठीं जास्वंदीच्या कळ्या
तुझ्या नयनीं भासती
नील कमल पाकळ्या
जशी चतुर्थीची कोर
तुझी देहलता खुले
नूपुरांच्या झंकारांत
मोर वळे, पळे, खेळे,
काव्य कमलांत आणि
वास होय नित्य तुझा
शब्दराणी तूं ग अशी
पद्य-प्रेम छंद तुझा—

# १३ सांजावल्या प्रकाशांत

सांजावल्या प्रकाशांत
जल भरून येई ती
घालुनिया कर एक
घागरीच्या मानेभोंतीं
गजगतिसम तिची
दिसे मंदावली चाल
होते गुलाब गालींचे
दमुनिया झाले लाल
वारा घालुनिया पिंगा
पदराशीं करी दंगा
चढूंनिया आली हळूं
घाट पायऱ्यांच्या रांगा
दिसे केशभार सैल
मानेवरी ओघळला
आणि हिरवा तीळ ही
होता ओठांचा भुकेला
झाले वदन वरती
आणि चरकलो झणीं--
भाळावरली नव्हती
तिच्या हांसत चांदणी--

# १४ ताज

तुझ्या माझ्या मनांमध्यें
प्रीत दाटली अपार
दावितेस तिचा मला
ताज बांधला सुंदर
परि हृदय भासतें
गोल घुमट मजला
गोड बोलांचा ज्यातून
साद एकू ये नित्याला

*

# १५ मेघनेस

यावीस पुन्हां तूं होउनिया मेघना
जाईन उजळुनी स्मृतींत तुझिया पुन्हां
कां विलंब आतां घन आषाढीं भरतां
मेघनेवांचुनी दीप्ती येइ न घना
क्षणभरच घेउनी ये, हातीं मधु पेले
दे प्राशायाला तुझ्याच हातीं भरले
जे प्राशुन होइन अमर-तृप्त मी पुरता—
तें मद्य सुधेतिल एकदांच दे विमले
डोळ्यांस हवे मज तव डोळ्यांतिल पद्य—
ओठांस हवे मज तव ओठांतिल मद्य
बाहूंत हवी मज प्रतिभा ही काव्याची
अन् जगास होइल कविता सहजच साध्य—

## १६ पारवा

माझ्या मनाच्या दाराशीं
रणरणे ऊन सदा
उधाणते सभोंवार
वाहतात उष्ण लाटा
उगीचच अशावेळीं
पाहतो मी आसमंत
दूर दृष्टीपथीं नच
दिसे सावलीची वाट
उजाड त्या माळावर
असा फिरतो उगीच
भर दुपारचे ऊन
साहतच, सोसतच
अशा उन्हांतच येतो
तुझ्या स्मृतीचा पारवा–
मनाचिया आडोशाला
तोच मनाचा गारवा–

# १७ कधीं मनांतली श्रद्धा

कधीं मनांतली श्रद्धा–होई मजला पारखी
आणि व्यथा अंतरीची–फुटे श्रीफलासारखी
उफाळतें सभोंवार–भावजीवनाचें पाणी
थेंबा थेंबांत जयाच्या–माझ्या व्यथेची कहाणी
आशा आकांक्षांचा गाभा–जोजविला जोपासला
गेला कुजूनिया सारा–सदा उन्हानें तापला
अशा सजल गर्भाची–धन उकीरड्यावर
टरफलांत मनाच्या–आतां कुजट अंधार
नाही पुन्हां नवेंपण–नाही तजेला अंकुर
नाही आशेची कल्पना–आतां उजाड अंतर
अश्रद्धेच्या माथ्यावर–तडकता आस्तिकता
वागवीत टरफल–दारोदार जाणें आतां–

## १८ कटिं लाविला पदर

कटिं लाविला पदर–तुझा कसा ग ढळला ?
ऊरस्थांचा तोंडावळा–कां ग उघडा पडला ?
भांग रेघेंतील तुझ्या–कुंकू विस्कटिलें कुणी ?
कशी हाताच्या कमला–सुगंधिते रातराणी ?
डोळीं घातलें काजळ–ओठीं कसें ग लागलें ?
गुलाबाचे गाल तुझे–कसे जास्वंदीचे झाले ?
पहांटेच्या गर्तेतून–कशी आली तुला जाग ?
रम्य स्वप्नांची समाधी–कशी जाहली ग भंग ?
कुठें झोपली होतीस–सांग कुणाच्या कुशींत
काय प्यालीस ना कळे–मधुचंद्राची तूं रात–

*

# १९ पदस्वामिनी

तुम्ही दिलवरा राया माझ्या सौभाग्याचं धनी
माझ्या सर्वस्वाचं धनी
पोत बांधली तुमच्यासाठीं माझ्या कंठीं आज
तुमच्यासाठीं चोळी चुड्याचा मजला हिरवा साज
माहेराची ओळख पुसली आज तुम्हां पाहुनी
तुम्ही हो सर्वस्वाचं धनी–
रसरसलेली दुपार तुमच्या संगतींत शीतल
तुमच्या विरहें जळांवाचुनी मासळिची तळमळ
संगतीस ह्या पंचप्राणहि टाकिन ओवाळुनी
तुम्ही हो सर्वस्वाचं धनी–
पदर पसरितें तुम्हांपाशीं म्हणा पायींची दासी
घ्या दासीला रुजू करुनिया जन्मभरी चरणासीं
ह्या पायावर सत्ता माझी, मी ह्यांची स्वामिनी
तुम्ही हो सर्वस्वाचं धनी–

# २० चंद्रलोक

एक क्षणाचा दिवस असावा
रात्र असावी बारा महिने
पृथ्वीवरती सदा जलासम
ओसंडावें सुधा चांदणें
चंद्र असावा नभा एवढा
चमकावा सूर्याचा तारा
दिग् मंडल ठेंगणें असावें
हातीं यावा खगोल सारा
इंद्रधनूच्या करुनि पायऱ्या
सहजच मग चंद्रावर जाता
विद्युत रेषांपरी भासतिल
भू लोकींच्या साऱ्या सरिता
एक क्षणाचा प्रवास व्हावा
भूगोलाच्या वरती सारा
चंद्रलोकींच्या सुधा प्रांगणीं
विहरावें मग महिने बारा–

संग्रहालय, ठा... २९६९५ पि: ३१०५ ९३६८ नों: दि ९१/३/५

## २१ ये संध्ये

ये भेटाया मज अखेरची ही सांज
खेळवीत येई उदासतेचें गूज
        मेघासम लेउन कृष्णवसन तिमिराचें
चढविला जयावर गभीरतेचा साज--
दाखवीत येई मार्ग नव्या जगताचा
उजळीतच येई पथ नव भवितव्याचा
        मी विलीन होता क्षणभर ह्या संध्येंत
होईन प्रवासी अनंतशा काळाचा--
ताऱ्यापरि माझें जीवन नित्य क्रमेन
वाऱ्यापरि विश्वीं वहात मी राहीन
        संध्येंत मिसळता क्षणभर जीवन माझें
पाऱ्यापरि चंचल तेजोमय होईन
ये संध्ये, उधळित निशिगंधाचा गंध--
तोडीत मनाचें अवखळ मृणाल-बंध--
        उधळीत शिरावर आकाशांतिल पुष्पें
ये संध्ये, सिंचन करीत मृदु मृद्-गंध
ये संध्ये अवचित, स्थित मी भेटायाला
        कोषांत तुझ्या नित विरल कृष्ण येण्याला
        परि थांब घेऊं दे क्षणभर पिऊनिया गे
हें विश्व सुखाचें, दुर्लभदर्शन मजला--

# २२ ती अधिरी अभिसारिका

पाहिलें तुला मी आज पुन्हां तेथेंच
क्षण आतुरता ती, डोळे भावुक तेच
पळभरच उभी तूं पुढती
न्याहाळित मनिचा नृपति
हो भेट दृष्टिची पुरती
सांगते कहाणी पुन्हां, गुपित मज तेंच
क्षण आतुरता ती, डोळे भावुक तेच
निशिगंध कधीं वेणींत
कधि रंग निळा साडींत
कधि सायंतन कधि रात
स्थळ तेंच परी भेटीचें, भाव अधिरेच
क्षण आतुरता ती, डोळे भावुक तेच
पाहता कधीं तें स्थान
तें गांव शिवेचें रान
तो निवान्त ओहळ गान
ती अधिरी अभिसारिका, स्मरें अितुकेंच
क्षण आतुरता ती, डोळे भावुक तेच--

## २३ विरह

तुझ्या संगतींत होई
माझ्या मनाची काहिली
तुझ्या वियोगांत मन
जळावांचून मासळी
सलतसे माझ्या उरीं
तुझ्या संगतीचा क्षण
तुझ्या वियोगांत मला
आगीवांचून मरण
ओढ नको संगतीची
नको विरहाची आग
तेजासाठीं मेघनेच्या
नको वारा, नको ढग--

# २४ नर्तकी

रुणझुणु पैंजण वाजुं लागले
थक् थय थक् थय पाय वाजले
तबल्यावरती ठेका पडता
तब्बलजीची दाढी हाले
सलाम केला सर्व मंडळी
अैकविते मी एक कव्वाली
पदर खोविता कथि सर्वांना
सांभाळा काळीज मंडळी
छन् छन् छन् छन् चाळ वाजती
धागिन् धिन् धा धागिन् धि धा
नाचुं लागली क्षणांत रमणी
तबल्यावरती ठेका पडता--
गरकन् गिरकी क्षणांत मारी
कटि हालवी अति कौशल्यें
मदनबाण अन् नयन सोडता
हृदयीं बसलीं खुपून शल्यें
नुपुर वाजता पायीं छन् छन्
झटपट निघती तबला ठेके
शब्द ऐकता वहावा वहावा
रसिक सारे घेती झोके
-रसिक सारे घेती झोके
नाग डोलती ऐकुन पुंगी
। डुलवित होती
एक र्नातका बहुविधरंगी--

## २५ यौवनगंधा

भावुक डोळ्यांतली तूझिया दोन पांखरें निळी
मनास माझ्या लावुन जाती ओढ तुझी आगळी
निळावंतीच्या निळसर लहरीपरि अंतर थरथरे
घालित वेडी साद पांखरू माझ्या मनिचें फिरे
उडून जातिल दूर कुठें तरी करीत भिरभिर वनीं
करीत सहजच मनांत माझ्या विरहाची पेरणी
बिजली परि तव प्रौढतेंतली नाचे यौवनरेखा
दिपवित डोळे कुटिल कुणाचे, उजळित मोहशलाका–
मादक मद्यामधें मिसळुनी, पुष्पांतिल माधुरी
अर्क तयाचा कुणी ओतिला, तुझिया अमृत अधरीं
ते डोळे, ते ओठ, तुझी ती अवखळ यौवनगंधा––
निशिगंधापरि मनांत माझ्या उधळित जाई गंधा––

## २६ अशीच यावी समता भूवर

सहजच समजा चुकूनिया कधि
आस मोडला पृथ्वीचा जर
ढळतिल सारे दिशा कोन अन्
ढळेल क्षणभर गौरीशंकर
सप्त देशच्या सप्त सिंधुचें
उडेल क्षणभर नभांत पाणी
धुवून जातिल तारा साऱ्या
धुवून जाइल क्षणभर धरणी
कफल्लतेच्या कुबेरतेच्या
मत्त माजल्या उर्मी क्षणभर
या पाण्यामधि जातिल धुवुनी
क्षणभर येइल समता भूवर
–अशीच यावी समता भूवर
पिचतचि राहे जेथें मानव
आस पृथ्वीचा नको ढळाया
देवांचेहि नकोच तांडव

## २७ मंदिर

मंदिर प्रभूचें–सुंदर बांधलें
प्रभूच्या भक्तांचें–सार्थक जाहले
ठेविलें उघडे–घडाया दर्शन
म्हाताऱ्यापर्यंत–लहानापासून
परंतु येऊन–कोणीसा पुकारी
राहील उघडे मंदिर दुपारीं
ठरल्या वेळींच–घडेल दर्शन
ठरल्या वेळींच–लाभेल पूजन
समर्था घरींचें श्वान हे मानून
राहिले स्तब्धच सारे ते सज्जन
कोंडले ते देव, बंद तीं मंदिरें
दुरून दर्शन भक्त घेती सारे
एके दिनीं पण–कडाडे चपला
खुललीं मंदिरें–प्रभू तो हांसला–

## २८ हा वामन आला

हा वामन आला मागाया भूदान
द्या तीन पाउलें अन्य नको वरदान
एकाच पाउलीं व्यापुन पृथ्वी सारी
जो व्यापुन राहिल चराचराला पूर्ण
जे खपती, श्रमती, स्वेद गाळितां मरती
दिनरात राबती फुलवाया ही धरती
भूपति खरे ते कर्षक भूमातेचे
सत्ता न ज्यांची मूठभर मातीवरती
ती आग पोटींची दान मागते आज
पृथ्वीवर अवघ्या नको कराया राज्य
क्षेत्रांत जेवढ्या श्रमतो गाळित रक्त
द्या तितुकी तरि हो भूमी राखा लाज
मागतो दान ना, शिष्टाई ही त्याची
ज्या कुंतिसुतास्तव, शिणली वाचा ज्याची
पदयात्रा ज्याची भूमिहीनांची आशा
पेरितें बिजेंजीं शस्त्रविहिन क्रांतीची
हा वामन आला मागायाला दान
लाजेल कुबेरहि द्या ऐसे हो दान
द्या तीन पाउलें–भूमिहीनांना थारा
अन् लिहा नव्यानें इतिहासाचें पान--

# २९ रंगुनी माझ्यासवें तूं

रंगुनी माझ्यासवें तूं गाइली गाणीं नवी
पौर्णिमेच्या चांदरातीं धुंडिली क्षितिजें नवी
मालतीच्या गुंफुनीया घातल्या माळा गळां
केतकीचा चक्रगुंफा केशपाशीं खोविला--
इंद्रधनुच्या रंगकांतीसमचि ल्यालों वल्कलें
मधुसुधा चषकांतुनी अन् कैफमद्यां प्राशिलें
श्वासिलें निशिगंध गंधा–प्राशिली प्रीतीसुधा
बावऱ्या वसुधेपरि अन् धुंडिली ज्योत्स्ना सुधा
जीवनींच्या यौवनीं ग वर्षिली वर्षा नवी
रंगुनी माझ्यासवें तूं गाइली गाणीं नवी
रंग पाण्याचा परी कां बदलला संध्येपरी--
थांबल्या कां पावसाच्या बरसणाऱ्या ग सरी ?
नाठवे का कमलिनीला संग भ्रमराचा आतां
विसरली कां, वाचली डोळ्यांतली प्रीतीकथा–
ना परी तूं खिन्न होऊं, शोध तूं क्षितिजें नवी
रंगुनी कोठेहि जाशी–हीच आशा मज हवी

## ३० आळ

घालता मजवरी भलता सलता आळ
मम मनांत ज्यानें उठवियला कल्लोळ
हा आळ न मजवर शर वर्षाव विषाचा–
जो करून गेला हृदय रक्तबंबाळ
मम सौभाग्याचें चिन्ह भाळिचें पुसलें
आधार जिवाचा माझ्या जरि उन्मळ
कवटाळुन मनिं मी तेंच ध्येय, तें चित्र–
राहीन मोजितच सदा आयु जें उरलें–
मी मनीं तयांचें चित्र सदा रेखीन
जे सदाच करिती मजवर अमृतसिंचन
बांधाल देह हा, मनास बंधन कसलें ?
त्यांच्याच जिवास्तव जीव, चितेवर दहन
पुष्पांतिल परिमल प्रीती हीच तयांची,
आकाश माउली वितरी माया त्यांची
आधारच धरणी वायु दे उत्साह
बालांच्या नयनीं मूर्ती दिसते त्यांची–
मी प्राण तयांचा ते माझे हृद्सर्व
प्रीतीचा त्यांच्या मनीं वसतसें गर्व
घ्या शंका माझी, हेमापरि संलक्षा
मी प्रिया तयांची, ते माझे गंधर्व––

## ३१ प्रणयपुराणें

एकदांच तव अष्टादश तीं
प्रणयपुराणें गाशिल ना ?
आठवणींच्या द्राक्षरसाची
गोडी ओठां आठवे साची
त्या गोडीची ओढ जिवाला, माझ्या देशिल ना?
प्रणयपुराणें गाशिल ना ?
कितीक रात्रीं चांदण्यांतल्या
सहवासाच्या रंगुन गेल्या
सहवासाचा वास सदा या, हृदयीं होइल ना ?
प्रणयपुराणें गाशिल ना ?
गुंतुन राही मन हें शतदां
लोभस नेत्रीं, हास्यीं कितिदां
त्या हास्याची पखरण हृदयीं, माझ्या करशिल ना?
प्रणयपुराणें गाशिल ना ?

## ३२ अगा क्रूरा पारध्या—

वृक्ष शाखेवर क्रौंच युग्म एक
प्रणय क्रीडारत बैसले वनांत
बहरलेली पाहून वनश्री ती
मुदें झालेलें मग्न कूजनांत—
सहज आला धांवुनी काळ शरसा—
आणि गेला विधूनि क्रौंच ऊर
क्षणीं पडला तो तडफडून खालीं
येइ पक्षिणीच्या मनीं दुःख पूर
पाहुनीया ती जखम जिवलगाची
समजवाया चिवचिवली पक्षिणी ती
तोंच तेथें पातला पारधी अन्
तपःसिद्धी वाल्मिकी क्षमामूर्ती—
"अगा क्रूर पारध्या, क्रौंच काळा
तुवा जीवांनिचा शांति क्षोभ केला
सहज उमटे देखुनी मुनीवाणी
तीच रामायण प्रसवली दिव्य वाणी—

## ३२ रुबाया—

परिणीता होऊन आलें तव दाराशीं
क्षणभरच वाटलें धरशिल मज हृदयाशीं
करपाश टाकता देहवल्लरी भंवतीं
जाईन विसरुनी मी पण तुझिया पाशीं--

*   *   *

कधि नीलकमल तव वदनाचें पाहून
मज संभ्रम पडतो वदनाचा त्याहून
क्षणभरच जागतें मनिं भ्रमराची वृत्ती
गवसती कमलिं तो, वदनीं राही खिळून

*   *   *

प्रीतीच आपुली आहे एक रहस्य
नित खंत जिवाला विरहाची-क्षण हास्य
घन तिमिरामध्यें निद्रित असतां जग हें
जागतें भेटिचें दैवत—प्रीत उपास्य--

# ३४ गुन्हा !

मी अजून होतों कंठित जीवन माझें
घेऊन शिरावर संसाराचें ओझें--
पदिं सरकत होता रखरखीत सहारा
नव क्षितीज पुढतीं, जाळी उधाण वारा--
जधि पथिक होउनी क्रमीत होतों मार्ग
अनुभवीत होतों आशेतच सुख-स्वर्ग
परि चुकुन लाभली हिरवळ एका जागीं
मन क्षणभर रमले निवान्त सुषमेलागीं--
प्राशिता तृषार्था जीवन ये उत्साह
मन क्षणभर रमले पाहुनिया नव गेह
संपला परी तो वर्षाकाल सुखाचा
देखावा सरला सुरेख सायन्तनिचा
पद सिद्ध जाहले जाया पुढती पुन्हा
अक्षम्य करुनिया विसावण्याचा गुन्हा-

# ३५ तुज पाहुन पाउल अडलें

किति सहज असें हें घडलें
तुज पाहुन पाउल अडलें
नव्हती ओळख, नव्हतें मीलन
हृदयीं नव्हती हुरहुर, स्पंदन,
होता डोळ्यांचें संभाषण
मीन नयन तव निळें आभाळीं--
पळभर खुलले, पळ बावरले--
हिरवा मरवा, मदन मोगरा
सोनकळीचा मुग्ध फुलवरा
कचबंधावरि करिती नखरा
दो नयनांतील कमळें फुलता
फुलराणीवर मन भुललें--
उषःकालची सुषमा सुंदर
पुनवेचा कीं चंद्र मनोहर
हेलावत नित मानस सागर
नयनामधल्या दोन तारका
पाहुन पाऊल अडखळलें--
किति सहज असें हें घडलें

# ३६ कधीं सुखाचें हें दार

वाटे हवेसेंच मज—रोज आकाश दर्शन
लाख तारांचा पसारा—रात दिनाचें भ्रमण
भास्कराचें अधिराज्य—कला चंद्राची वाढती
सांज सकाळ रंगली—उगवती मावळती
घन आषाढीं व्यापिती, कधीं अंबराचा गाभा
वीज लकाकून कधीं, नभीं वितरतें शोभा
ऊन पाऊस दावितो, इंद्रधनु चेतोहर
क्षण सुखावतें मन, माझें पाहता अंबर
पाही सदाच आकाश, असें सुखावलें मन
त्याची रागीटशी माया, करी मना सुखासीन
—कधीं सुखाचें हें दार, उघडिता सहजच
मन गूढ भावनेनें—चरकतें उगीचच
दृष्टि सुखाच्या मनाला, भासें कांहीं निराळेंच
भांबावलें मन मग—होइ उदास उगीच——
पडे मनावर माझ्या, जणुं आकाश सांवली
मनाचिया आकाशांत, उभी विशाल पोकळी—

*

## ३७ फूल—

कधींतरी अचानक
येते तुझी आठवण
आणि उगीचच माझें
जाते मोहरून मन
आठविती द्वाड तुझ्या
कांहीं कल्पना, वल्गना
सुखविती क्षण माझ्या
कांहीं कामना, यातना
द्वाड तुझ्या कल्पनेशीं
कधीं खेळता एकान्तीं
उदासतो उगीचच
व्हाया विरह समाप्तीं
गोड तुझ्या कल्पनेशीं
कधीं खेळता उगीच
सहवासाचा तूझिया
येइ आठव बळेंच
तुझ्या आठव वेलीला
फूल येतें बहरून
—दूरतेच्या जाणिवेचें
आणि बधिरतें मन——

# ३८ तुझ्या आठव गंधांत

तुझी नाजुक देहली, दीपकळी तेजस ती
आलंगिता कधीतरी, यावी पतंगाची मुक्ती
कमळाच्या पाकळीची, ओठांची ग ठेवण ती
त्याच ओठांत लाभावी, मला भ्रमराची तृप्ती
डोळ्यांतली तूझिया ग, मुग्ध मेघनेची दीप्ती
माझ्या मानस मेघाची, क्षण जागवी सुषुप्ती
---तृप्ती, मुक्ती सुषुप्तींत, नित नाहतें जीवन
तुझ्या आठव गंधांत, जधिं मोहरतें मन---

का. क. ८४१२

## ३९ सायन्तनिं घडतां—

मज सदाच स्मरते उषा उजाळिता भाळ
रमवितो मनाला माध्यान्हीचा काळ
        परी कधीतरी ये सांज खिन्नशा पायीं
पसरीत भोवतीं उदासतेचें जाल
कधीं तलाव कांठीं दूर टेकडीवरती
भटकतो स्वैर मी दिवसा आणिक रातीं
        निर्विकार नीरस सांज कधीं परि दिसतां
सोडून न जातो चार घराच्या भिंती
कधींतरी अचानक स्वप्नांतुन ये जाग
आळवीत बसतो तोच दिवसभर राग
        परि सायन्तनिच्या निराशतेच्या रेखा
बुझवून टाकिती चित्रामधलें रंग
आठवे तूझिया सहवासातिल काल
आठवते थट्टा, राग, लाडके बोल
        अन् सांज कधीं मग अबोल एकाकी ये
एकलेपणीं मग जळतो कांहीं काळ——
कधींतरी आठवे गीत, स्फुरतसे ओळ
वाटतें लिहावा यक्षाचा कल्लोळ
        सायन्तनिं घडतां परी कांहिसें गूढ]
न्याहळीत बसतो दूर नभाचें भाळ——

*

# ४० काळाच्या भाळावर

वाऱ्याच्या फुंकरिनें पृथ्वी
झुलतच जावी आकाशांत
पाण्याच्या गाण्यांत रहावी
निसर्ग राणी गाणीं गात
पक्षांची वृक्षावर घरटीं
त्या झुळुकीनें हलतिल डुलतिल
काळाचे चक्रांतुन दाते
गरगर गरगर अखंड फिरतिल
अण्वस्त्रांच्या शत दाढांनी
ब्रम्हाण्डाचें खांड गिळावें
जलबिंदूतिल जलधीमध्यें
विश्वाचेही व्योम बुडावें--
लेउन लेणे रविकिरणांचें
उदधीचें अन् पिऊन पाणी
पृथ्वीला जिंकाया मानव
पवन गतीनें जाईल निघुनी
एकच त्याच्या ओठीं गाणें
एकच त्याच्या उरांत आशा
ऐरावतही पोखरण्याची
मरगळल्या मुंगीची भाषा
पृथ्वीच्या पोटांतिल लाव्हा
हिमालयाच्या लावुन टाकीं
काळाच्या भाळावर ऐसें
लिहित रहावें शतकोशतकीं--

# ४१ अनंत काळचा दिगंत प्रवास

अनंत काळचा दिगंत प्रवास
हंसते पुढती अंधारी अवस
वैफल्याचें ओझें मनाच्या पाठींत
थकलेले पाय चाललें रेटींत--
--चाललें रेटींत, शरीर दुबळे
अंधाऱ्या गर्तेत थडके ठेचाळे
थकले भागले मुकेंच परि तें--
मनाच्या ओझ्याला उगीच वाहतें--
उगीच वाहतें पोकळ गाभारा
फुटला तुटला फापटपसारा
चौथरा कळस शिल्पांचे पाषाण
वाहतें, शरीर मनाला निष्प्राण
--निष्प्राण मनाच्या शरीर मंदिरीं
ज्योत पाजळत होती अशरीरि
कोसळें परंतु, देऊळ आशेचे
भंगले मनोरे, मंदिर मनिचें
--भंगलें मंदिर घेउनिया आतां
वाहतो फुकाच पायांचा माथा--
जावयाचे कोठें, कळे न कोणास
अनंत काळचा दिगंत प्रवास--

# ४२ आज-उद्यां–

पाहतो उद्याच्या स्वर्गाचें सौंदर्य
वाहतें जयांतुन पुरेपूर औदार्य
साहवे न मजला परी आजचा जाच
वा स्वर्ग यशाचें नसेंच मजला धैर्य
मन रम्य उद्यांच्या हिंदोळ्यावर डोले
कीं गात मनामधिं गाणी वसंतचि बोले
साहवे न मजला परी आजचा ग्रीष्म
बहरलें न पुरते जीवन, दग्ध जहालें––
येणार माझिया घरीं उद्यां तूं गात
मधु वसंत फुलतिल सदनीं ऐकुन गीत
परि आज उभा मी दारीं नियतीच्या कीं–
पाहूं नच शकतो हाय उद्याचा थाट––
तूं उद्यांच होशिल माझी वैभवराणी
रंगशील मजला घेऊन प्रेमोद्यानीं
अस्तित्व आजचे परि न साहवे मजला
साशंक गणाया उद्यास माझ्या जीवनीं
मज उद्यापासुनी मिळायचें नव तेज
मी उद्यां पासुनी लेइन नवाच साज
मी उद्यांपासुनी नवाच आहे सारा–
कीं आहे बांधली ताटी माझी आज
मी होतो म्हणुनी उद्यां म्हणा तुम्हीही
मी स्तुती कांहिशीं, किंवा आठवणीही
कीं उद्यांच माझा उरका वा सत्कार
रात्रींतच आजच्या आहे व्हायचें कांहीं––

क्रमांक ......२२५१...... दि: ०३/०५.....
क्रमांक ......१३५८२...... नों: दि: ९/२/३/४



# ४३ गाणीं घ्या हो गाणीं

गाणीं घ्या हो गाणीं
विरह मंजिऱ्या प्रीत फुलोरा, एका मोलें दोन्हीं--
गुलाब, शेवंती, निशिगंध
कोमल कुसुमातिल मकरंद
गंधागंधातून तरळते उन्मादक वाणी--
हितगुज होइल दो नयनांचें
तुम्हा सांगतिल गूज ओठिचें
क्षणांत पटतिल खुणा हृदयिच्या, गाल पांखरावाणी-
तरुतळ, कातळ, निर्झर झुळझुळ
तरुपर्णांची मृदुतल सळसळ
पानांपानांतून हांसते, नवती निसर्ग राणी--
पुरुरव्याची इथें उर्वशी
यौवनगंधा ही अभिलाषी
अबलख वारूवरी रंगली रावासह मस्तानी--
या न तारका, ही न चंद्रिका
ही न रवीची तेज शलाका
सुभगा या परि करितिल सेवा, रसिका मानुन धनी,
गाणीं घ्या हो गाणीं--

# ४४ मन मदनाचें माझें

कधीं अचानक येते—येऊ नये तीच वेळ
मन मदनाचें माझे, खेळे मनाशींच खेळ
तटबंध संयमाचा, कधीं उल्लंघितें मन
होई प्रवाह पतित आणि सरिते समान
कधि पाखरांच्या संगे घेइ आकाशीं भरारी
जाइ कधीं कुंजवनीं गोड ऐकून पावरी
वाटें जावें विहरत कधीं नभीं मेघासवें
टिपुनिया वायुपरी घ्यावी फुलांचीं आसवें
बरसात चांदण्यांची फुलांतिल मधुगंध
धुंद तुझी ती पावरी करी मनाला स्वच्छंद
मन, मदन मनाला, सांगे नको खेळूं खेळ
नको संगत संगीत, नको प्रीतीचें मोहळ——

# ४५ सहीनिशाणी

वाचलीस का माझ्या नयनीं
तुझ्या प्रीतिची सही निशाणी
ओळख झाली आपुली तो क्षण
नयन रोखले नयनीं आपण
विद्ध करुनिया त्याच क्षणीं पण---
गेलिस निघुनी-गेलिस निघुनी--
आठविता कधि मी गत गोष्टीं
आठवितें मज सारी सृष्टी
सांठविली जी तव स्मृतिगांठीं
तव ओठांनी-तव ओठांनी---
येशिल जरि गे क्षण ओझरता
वाचायाला नयनीं गाथा
दिसेल तुजला एकच आतां
प्रेम कहाणी–प्रेम कहाणी
तुझ्या प्रीतिची सही निशाणी--

# ४६ तें माझें घर

तें माझें घर, तें माझें घर
आठवणींचा सदा बहरला जेथें गुलमोहर
उभी समोरी तुळस अंगणीं
जाइ जुईच्या रम्य कुंजवनीं
परसदारीं नित प्राजक्तीचा–सडा पडे भूवर
बहरला जेथें गुलमोहर––
ओटींवरती भावंडांचा
जिथें गलबला नित खेळाचा
संगे ज्यांच्या शैशव माझें, लाभे मज क्षणभर
बहरला जेथें गुलमोहर––
घेतां आई मजला जवळीं
मायेच्या पांघरुणाखालीं
शत जन्मीचें दुःख विसरतें, जेथें मम अंतर
बहरला जेथें गुलमोहर––
माय पित्यांच्या प्रेमळ हांका
त्या गुजगोष्टीं, आणाभाका
आयुष्याची गाथा घडली, जेथिल मातीवर
बहरला जेथें गुलमोहर––
असतां कोठें दूर योजनें
रमतो अजुनी त्याच्या स्मृतिनें
क्षणभर डोळे मिटुन, उघडतो स्वर्ग सुखाचें दार
बहरला जेथें गुलमोहर––

# ४७ दोन पाउलें

पांढरे पाऊल
पाशवी सत्तेच्या मत्त नर्तकीचें
पडलें पहिलें
छाताडावरती भारत देशाच्या
दाबानें जयाच्या
हादरला देश
उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत
काळी निळी झाली पाउलांची जागा---
---कराया लागली नर्तन नर्तकी
घेऊन हातांत संदुका आणि---
गीत गात शांततेचें---
तांडव नृत्य तें---
शस्त्रास्त्रें घेतल्या
मत्त नर्तकीचें---
बेभान नृत्य तें
हृदयावरती दुबळ्या देशाच्या
वहाया लागल्या
रुधिर गंगा---
धारातीर्थावरी पडाया लागल्या---
हुतात्म्यांच्या रांगा
आक्रंदला जीव
विद्ध झाला जीव---
अन्याया विरुद्ध
उधाणला त्वेष---

क्रुद्ध झाला देश
कोटी मुखांतून उफाळे आवेश
—नाचत नाचत मत्त नर्तकी ती
गेली सावकाश
टाकून दुसरें पांढरें पाऊल
दुसऱ्या टोंकाला
दुबळ्या देशाच्या—
खूण पाउलांची
काळी निळी जागा
'पाक' त्या पाउलीं
आहे उमटली, आहे उमटली—

ग्रंथ संग्रहालय, ठा. ...
२७५७५ वि: ३१०५
७३.५२ नों: दि २२.३.५४

## ४८ कामदेव उत्सव

उषःकाल सुषमेंत नाहली उज्जयिनी नगरी
आम्र तोरणें असति लाविली दारा दारावरीं
रंगावलिनी पथा पथांतुन सजल्या चित्राकृति
लतापल्लवें कमान शोभे, फुलल्या फुल झालरी
रंगमंच अतिभव्य सजविला नगरीच्या बाहेर
नृत्य गायनीं रंगुन गेले, अवघे जेथें नर
गुलाल कुंकुम फुलें सुगंधित अधळित वातावरणीं
मोद मनांतिल पुलकित करिती, गीतांचें सुस्वर
कामदेव उत्सवीं रंगल्या रूपयौवना ललना
लेउन वसना रत्नजडित अन् लोभस आभरणा
झंकारित पायिचीं पैंजणें, कटिवरल्या मेखला—.
नेत्रकटाक्षा फेंकित जाती, कामदेव दर्शना
चिर यौवन सुंदरी जाहल्या क्रीडारत मंदिरीं
फुलें उधळती मूर्तीवरती रंगित गंधभरी——
मदनरति मीलनीं रंगला कामदेव उत्सव——
प्रणयोत्सुक प्रणयिनी पावल्या दंग प्रणयसागरीं
भाळीं चंदन रेखा खुलवी तारुण्याचे ओज
पुष्ट तनूतुन मदन भरा ये, नयनीं खेळे वीज
घेउनिया प्रियतमा संगती तरुण येत मंदिरीं—
प्रणयपूर्त मन फुलवित, रमवित, मिरवित यौवन साज
हिंदोळ्यावर झोके घेई, प्रणयी युग्म ते कुणी
नृत्य करितसे कुणी सख्यासह, रमले कुणी गायनीं
कुसुमकोमला प्रणयमुग्ध त्या, अधीर अभिसारिका
मधुवच, मीलन, पान अधरिचें, अर्पि प्रियाला कुणी—

गळयांत माळा मृदु कुसुमांच्या, फुलें बाहु भूषणीं
कोमल गंधित झेले अर्पी परस्परांना कुणी
भेट प्रियेची, वचन भेटिचें, फुलाफुलांची भाषा–
दरवळल्या गंधांत रंगलीं, युग्में तीं उद्यानीं
न्याहाळीत ते नवलाईचें उत्सवसुख आगळें
चारुदत्त ये काम मंदिरीं, टाकित हळु पाउलें
समीप त्याच्या सखा तयाचा वृद्ध भिक्षु मत्रेय–
एका हातीं सांवरीत ते अंतरीय सांवळे–
कुंकुम पुष्पें अर्पुन पायीं, उचलुन दीपज्योती
ओवाळुन आरती परतला, चारुदत्त मागुती
एकवार तो दर्शन घेई, वळुन कामदेवाचें–
द्वारापाशीं, होय तयाला दर्शन एका रतिचें
थरथरत्या हृदयांत जाहली अस्फुटशी वेदना
घनतिमिरांतुन क्षणभर चमके मोहमयी मेघना
नयन भेटले दो नयनांना, शद्ब जाहले स्तब्ध–
दो हृदयांचें हितगुज झाले, सुटला गहन उखाणा
पाकळिच्या पाशांत सुकोमल गंध राहिला स्थित
कोमल कलिका उभी पुढें ही, मादक गंधासहित
गंधित कुसुमें जिनें माळली देहवल्लरी वरती–
वसंतसेना, गंधवल्लरी, पाहि चारुदत्त
रंगत होता उत्सव तेथें अजून उत्तररात्रीं
वसंतसेना ये निज महालीं, जडता घेउन गात्रीं
कर्ण विभूषित झाले ज्यांचा गुण गौरव अैकुन–
चारुदत्त, ती घेई पाहुन, सांठवून नेत्रीं–

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थ
क्रम २९८९५ वि: ३१०५
क्रमांक ... ९३५८२ नों. दि. २४३।५

# ४९ महाराष्ट्र-गीत

महा महाराष्ट्राच्या मर्दा मंत्र मराठीचा
तुझा गर्जु दे घुमवित अवघा प्रांत भारताचा
सह्याद्री अन् विंध्याद्री हे ज्याचे आधार
गोदा, कृष्णा, भीमा ह्यांचे गळयांमधें हार
देहू आळंदी पंचवटी ही अन् पंढरपूर
पुनीत ज्याला करिती क्षेत्रें स्वर्गाहुन थोर
मराठवाडा गोमांतक हे ऐरावत दोन
तुझ्या घालिती हार गळयांमधि विनीत होऊन
याच महाराष्ट्रीं लढले रणमर्द
याच महाराष्ट्रीं संतांची साद
त्या वाणीतिल त्या बोलीतिल मंत्र मराठीचा–
तुझा गर्जुदे
इथें नांदलें शिवरायाचें मराठीचे राज्य
महाराष्ट्र हा बोलीसाठीं लढण्या हो सज्ज
रामदास जल कमंडलूतुनि बोध इथें ओती
इंथेंच तरली सरितेंपोटीं तुकयाची पोथी
श्री ज्ञानेशानीं हिरे मोतियांनी
तुला भूषविलें अमृत ती वाणी
त्या वाणीतिल त्या बोलीतिल मंत्र मराठीचा
तुझा गर्जु दे घुमवित अवघा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८९२

## याच लेखकाची इतर पुस्तकें

* विकास गीतें

*आगामी*

* **मृदुला** (पांच संगीतिका)
* **मेदिनी** (खंडकाव्य)
* **मधुराणी** (भावगीत संग्रह)

संग्रहालय, ठाणें.
२९८९५ वि: ३१०५
९३४२ दि: ९।३।५०
वा. क. ८४९२
REFBK-0009412
REFBK-0009412

# प्रकाशकाचें निवेदन

पुस्तकरूपानें प्रकाशांत येण्याचा मान या काव्यसंग्रहाद्वारें ज्यांना मिळत आहे ते माझे मित्र श्री. पुरुषोत्तम सखाराम कुलकर्णी हे मराठींतील एक उदयोन्मुख कवी आहेत. काव्यक्षितिजावर गेलीं बारा वर्षे त्यांचें वास्तव्य आहे व्यक्तिगत अनुभूतीच्या गवाक्षांतून सामाजिक प्रक्रियेची मौज पाहणारी त्यांची काव्यप्रतिभा लोभस्-नीटस् आहे. अवघ्या अर्धशत कविता सुमनांची ही परडी आम्ही वानगीदाखल रसिकांप्रत सादर करीत आहोंत. श्री. कुलकर्णी यांनीं आजवर पांचशेंवर कविता लिहिल्या असून त्याचेवरहि रसिकांची नजर पडण्याचा सुयोग शीघ्र येवो एवढीच इच्छा.